स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक :- १८/११/२०१८

## मालेगाव शहरात दरोडयाचे तयारी असलेले सराईत गुन्हेगार गजाआड

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील सराईत गुन्हेगारांचा फास आवळण्यासाठी **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी जिल्हयातील ४० पोलीस ठाणेनिहाय गुन्हेशोध पथके तयार करून सशस्त्र नाकाबंदी व दरोडागस्त योजना तयार केली आहे. जिल्हयात घडणारे गंभीर गुन्हयांचा अभ्यास केल्यानंतर प्रामुख्याने दरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरीचे गुन्हयांतील सराईत गुन्हेगारांवर वचक बसविण्यासाठी तसेच त्यांचेवर प्रभावी व परिणामकारक कारवाई करण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक सो यांनी आदेश दिले आहे. त्यानुसार मालेगाव विभागाचे अपर पोलीस अधीक्षक श्री. निलोत्पल सो यांचे मार्गदर्शनाखाली मालेगाव शहरातील पोलीस ठाणेनिहाय सराईत गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी धडक कारवाई सुरु आहे. दरम्यान दिनांक १७/११/२०१८ रोजी रात्रीचे सुमारास मालेगाव शहरात दरोडया सारखा गंभीर गुन्हा करण्याचे तयारीत असलेले ०४ सराईत गुन्हेगारांना पवारवाडी पोलीसांनी ताब्यात घेवुन कारवाई केली आहे.

मालेगाव शहरात रात्रगस्तीवर असलेले पवारवाडी पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी काल दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ रोजी ओवाडी नाला परिसरात सापळा रचुन दरोडयाचे तयारीत असलेले ०४ सराईत गुन्हेगारांना पाठलाग करून ताब्यात घेतले, यातील ०२ गुन्हेगार पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेले असुन ताब्यात घेतलेले संशयीत नामे **१) मोहम्मद युसूफ मोहम्मद याकुब,** वय २२, रा. पवारवाडी, मालेगाव, **२) अब्दुल रहेमान शेख शब्बीर**, वय १९, रा. पवारवाडी, मालेगाव, **३) मोहमद मुस्तफा मोहमद आमीन,** वय १८, रा. नजमाबाद, मालेगाव, **४) वसिम अहमद नसीर अहमद,** वय १९, रा.पवारवाडी, मालेगाव यांचे कब्जातुन **०१ तलवार, ०१ लोखंडी रॉड, स्क्रु ड्रायव्हर, दोर व मिरचीची पुड** असे दरोडा तयारीचे साहित्य साधने मिळुन आले आहे. तसेच सदर आरोपीतांनी गुन्हा करणेसाठी वापरलेली मोटर सायकल जप्त करण्यात आली असुन ०४ मोबाईल फोनही हस्तगत करण्यात आले आहे. यातील **आरोपी मोहम्मद युसूफ मोहम्मद याकुब** हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरूध्द पवारवाडी पोलीस ठाणेस दरोडा, जबरीचोरी, घरफोडी, चोरी, दुखापत यासारखे गंभीर गुन्हे दाखल असुन त्याने अलिकडेच त्याची गॅंग तयार केली होती. सदर आरोपी हा त्याचे वरील साथीदारांसह मालेगाव शहरात दरोडा टाकण्याचे तयारी असतांना पवारवाडी पोलीसांनी त्यांना ताब्यात घेतले असुन त्यांचेविरुध्द **पवारवाडी पोलीस ठाणेस भादवि कलम ३९९ प्रमाणे गुन्हा दाखल** करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचे तपासात सदर आरोपीतांकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. निलोत्पल सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पवारवाडी पोलीस ठाणे कडील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर कारवाई करून ०४ सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले आहे.